पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा. स्थायी समिती विशेष सभा**

कार्यपत्रिका क्रमांक – १

सभावृत्तांत

दिनांक – **३१/०३/२०१७** वेळ – दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा शुक्रवार दिनांक **३१/०३/२०१७** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात **मा.डॉ.विपिन शर्मा, (भा.प्र.से.) आयुक्त, साखर तथा पिठासीन प्राधिकारी** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.ढंडे लक्ष्मण धोंडू
२. मा.कुंदन अंबादास गायकवाड
३. मा.सावळे सिमा रविंद्र
४. मा.उत्तम प्रकाश केंदळे
५. मा.मुंढे उषा अंकुश
६. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७. मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८. मा.कुटे निर्मला संजय
९. मा.कोमल दिपक मेवानी
१०. मा.आशा धायगुडे – शेंडगे
११. मा.गोफणे अनुराधा देविदास
१२. मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४. मा.राजू मिसाळ
१५. मा.अमित राजेंद्र गावडे
१६. मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.तानाजी शिंदे – अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.दिलीप गावडे – सह आयुक्त, मा.डोईफोडे, मा.आष्टीकर, मा.बोदाडे – सहा.आयुक्त मा.पवार – अतिरिक्त कायदा सल्लागार, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा आयुक्त, साखर** सन्मा. सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत स्थायी समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी क्रमांक: नपाप्र/१/कावि/१८४/२०१७, दि.२४ मार्च २०१७ च्या आदेशान्वये त्यांचा प्रतिनिधी म्हणून विशेष स्थायी समिती सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून **डॉ.विपिन शर्मा,** आयुक्त, साखर, पुणे यांना म्हणजे मला या ठिकाणी नियुक्त केलेले आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामाकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.

**( मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली)**

**मा.नगरसचिव -** मा.स्थायी समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार नेमणुक करणे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल. मा.विभागीय आयुक्त यांचेकडील आदेश क्र.नपाप्र/१/कावि/१८४/२०१७, दि.२४ मार्च २०१७ अन्वये मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून **मा.डॉ.विपिन शर्मा** – आयुक्त, साखर, पुणे यांची नेमणुक करणेत आलेली आहे.

मुदतीत दाखल झालेली एकाच उमेदवाराची ४ (चार) नामनिर्देशनपत्रे छाननी करिता मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपुर्त करण्यात येत आहेत.

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा आयुक्त, साखर** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, स्थायी समिती पदाकरीता एकाच उमेदवाराची ४ (चार) नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामध्ये उमेदवार व त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | **मा.सावळे सिमा रविंद्र** | मा.आशा धायगुडे-शेंडगे | मा.कोमल दिपक मेवानी |
| २) | **मा.सावळे सिमा रविंद्र** | मा.कुटे निर्मला संजय | मा.उत्तम प्रकाश केंदळे |
| ३) | **मा.सावळे सिमा रविंद्र** | मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे | मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे |
| ४) | **मा.सावळे सिमा रविंद्र** | मा.मुंढे उषा अंकुश | मा.कुंदन अंबादास गायकवाड |

( या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

मा.सभापती, स्थायी समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एकाच उमेदवाराच्या एकूण ४ (चार) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असून ती चारही नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा.स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सावळे सिमा रविंद्र** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी कायद्यात तरतूद आहे. सभागृहाच्या संमतीने सदर कालावधी कमी करता येईल.

उमेदवारी मागे घेतली नसल्यामुळे मा.सभापती, स्थायी समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सावळे सिमा रविंद्र** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.सावळे सिमा रविंद्र** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १
दिनांक - ३१/०३/२०१७ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एकाच उमेदवाराच्या ४ (चार) नामनिर्देशन पत्रांमधील मा.स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सावळे सिमा रविंद्र** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.सावळे सिमा रविंद्र** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **स्थायी समितीचे सभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

सही/-
**(डॉ.विपिन शर्मा)**
पिठासीन प्राधिकारी
तथा आयुक्त, साखर
स्थायी समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

( नवनिर्वाचित सभापती **मा. सावळे सिमा रविंद्र** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

ठराव क्रमांक - २
दिनांक - ३१/०३/२०१७
सुचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे

विषय क्रमांक - २
विभाग - नगरसचिव
अनुमोदक – मा.राजू मिसाळ

मा.स्थायी समिती सभा प्रत्येक सप्ताहात मंगळवारी दुपारी ०२.०० वाजता भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी / सुट्टया असलेस त्या सुट्टी/ सुट्टयानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ०२:०० वाजता सभा भरविणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सावळे सिमा रविंद्र )**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६७५/२०१७
दिनांक : ३१/०३/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.